दै. गोदातीर दि. 16.11.25

# खून करुन फरार झालेल्या आरोपींना तीन तासात ठोकल्या बेड्या

## नांदेड ग्रामीण गुन्हे शोध पथकाची कामगिरी



नवीन नांदेड (प्रतिनिधी) – ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत पंचशील नगर, बळीरामपुर येथील किराणा दुकानात अज्ञात तिघांनी खून केला. त्यानंतर फरार झालेल्या अज्ञात तीन आरोपींना तीन तासांमध्ये ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामीण गुन्हे शोध पथकाने अटक केली आहे.

पंचशिल नगर बळीरामपुर येथील ऑटोचालक राष्ट्रपाल तुकाराम कपाळे (वय ३९) हा दि. १४ नोव्हेंबर रोजी स्वतःचे किराणा दुकाना बसला होता. सायंकाळी सातच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी राष्ट्रपाल कपाळे यास धारदार शस्त्राने छातीवर, पाठीवर वार करुन त्यास गंभीर जखमी करुन त्याचा खुन केला. त्यानंतर राष्ट्रपाल कपाळे याची आई कस्तुरबा बाई कपाळे यांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तक्रार मिळताच ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी तात्काळ वेगवेगळया पाच पथकं तयार करुन अज्ञात आरोपीतांचा शोध घेण्याचे आदेश दिले. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शना खाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड, व्यंकट कुसमे व सोबत पथकातील अंमलदार असे अज्ञात आरोपीचा शोध घेण्यासाठी तपासाला गती दिली.

मृत राष्ट्रपाल कपाळे याचे गुन्हेगारी रेकॉर्ड चेक केले. त्यात राष्ट्रपाल कपाळे यांनी सोळा सतरा वर्षापुर्वी राजु गवळे याचा खुन केला होता. या वैमनस्यातुन हा खून झाला असावा, असा संशय पोलिसांना आला. या संशयावरुन राजु गवळे याचा मुलगा नागेश गवळे याला ताब्यात घेण्यात आले. त्याची कसून चौकशी केली असता नागेश गवळे व त्याच्या दोन मित्र नामे अभिजीत गजभारे रा.धनेगाव व लक्की पारखे रा. गौतमनगर नांदेड यांनी मिळुन राष्ट्रपाल कपाळे याच्या किराणा दुकानात जावुन त्यास खंजरने मारुन त्याचा खुन केला. त्यानंतर मोटारसायकलवर पळुन गेल्याचे निष्पन्न झाले.

गुन्हे शोध पथकाने तात्काळ तिन्ही आरोपींना ताब्यात घेतले. तसेच गुन्ह्यात वापरलेल्या मोटारसायकल जप्त केली. पोलीस अधिकारी व अंमलदार पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मटवाड, व्यंकट कुसमे, पोहेकॉ वसंत केंद्रे, हरिष मांजरमकर, पोकों मारोती पचलिंग, विष्णु कल्याणकर, मारोती भांगे, संतोषपवार, मेकलवाड, कवठेकर, सायबरचे पोहेकॉ अंमलदार यांचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतूक केले आहे.